पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

वाशिम

• वर्ष १ • अंक ७५ • शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ • मूल्य ३ • पृष्ठे ४

RNI No.- MHAR/ 26 /A4530 Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 Web.http://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

माणसाच्या आयुष्यातील संकट ही यशाचा आनंद घेण्यासाठी आवश्यक आहेत.




## »थोडक्यात

### कंत्राटी कर्मचाऱ्यांचा सोमवारपासून कामबंदचा इशारा

**अकोला :** जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाच्या अधिपत्याखाली सक्षम फॅसिलिटी प्रा. लि., मुंबईमार्फत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे मागील चार महिन्यांपासून वेतन थकीत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. थकीत वेतन तातडीने अदा न झाल्यास १० ऑगस्टपासून कामबंद आंदोलन करण्याचा इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांनी जिल्हा शल्यचिकित्सकांना लेखी निवेदन देत प्रलंबित वेतन तातडीने अदा करण्याची मागणी केली आहे. चार महिन्यांपासून वेतन न मिळाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांवर गंभीर आर्थिक संकट ओढवले असून, दैनंदिन घरखर्च, मुलांचे शिक्षण, कर्जाचे हप्ते आणि इतर अत्यावश्यक खर्च भागविणे कठीण झाल्याचे कर्मचाऱ्यांनी निवेदनात म्हटले आहे. वारंवार तोंडी तसेच लेखी पाठपुरावा करूनही वेतन अदा करण्यात आले नसल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन प्रलंबित वेतन अदा करावे, अन्यथा १० ऑगस्टपासून कामबंद करण्यास आम्ही बाध्य होऊ, असा स्पष्ट इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# मनपाची अदानी गॅसवर 'मेहेरबानी'?

## महापालिकेचा आर्थिक नुकसान करण्यामागे कोण

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला :** अकोला महापालिका आणि सत्तारुढ शहर विकास आघाडी अदानी टोटल गॅस लि.वर मेहरबान असल्याचे चित्र आहे. केंद्र सरकारने आखाती देशातील युध्दजन्य परिस्थितीत काढलेला आदेशाचा तशी परिस्थिती नसताना वापरल्याचे चित्र आहे. गॅस टंचाई नसताना केवळ अदानी ला पायघड्या टाकण्याचा उद्योग केला गेला. राज्यात पाईप नॅचरल गॅस पुरवठ्यात ९० टक्के वाटा हा एम एन जी एल, एम जी एल, जी जी एल सारख्या कंपन्या आहेत.

केंद्र सरकारच्या सार्वजनिक उद्योगातील (पी एस यु ) कंपन्यांना संधी न देता थेट अदानी ला अकोल्यात संधी देण्यात आल्याचे चित्र आहे. इतकेच नाही तर महापालिकेची जागा लीजवर देताना किंवा विकत देताना ती लिलावाद्वारे देण्याची गरज होती.

हा राज्य सरकारचा आदेश ही महापालिकेने पायदळी तुडविला. इतक्यावर महापालिका थांबली नाही. तर जागा ऑक्शन न केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान होत असल्याचा आरोप आहे. मनपाने रेडीरेकनर दरानुसार भाड्याचा ठराव शहर विकास आघाडीने घेत प्रशासनाला साथ दिली व अदानी समोर नतमस्तक झाले.

या सर्व प्रकरणात महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे चित्र आहे. जे मनपाचे नगरसेवक अपात्रतेचे कारण ठरू शकते.

राज्य सरकारने सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांना पाठविलेल्या पत्रात पहिले ३० जून व नंतर ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत राज्य सरकारच्या नगर विकास विभागाचा आदेश व्हॅलिड असल्याचे स्पष्ट केले होते. पहिल्यांदा अदानी टोटल गॅस लिमिटेड ने गिता नगर, सिव्हील लाईन्स, गोरक्षण रोड या पैकी एका ठिकाणी ५ बाय ५ मीटर अर्थात २७० चौरस फुटाची जागा मागितली.

नंतर अचानक मे महिन्यातील पत्रानुसार अधिकची जागा मागितली गेली. अकोला शहरातील अत्यंत महत्त्वाच्या आणि मोक्याच्या शासकीय-सार्वजनिक जमिनी खाजगी उद्योजक असलेल्या 'अदानी टोटल गॅस लि.' कंपनीला देण्याची जोरदार तयारी अकोला महानगरपालिकेत सुरू असल्याचे उघडकीस आले आहे. एकीकडे अतिक्रमण केले म्हणून कारवाई करणारी महापालिका तर दुसरीकडे शासकीय आदेशांचा आधार घेत अदानी गॅस कंपनीला अवघ्या २४ तासांत परवानग्या आणि मोक्याचे भूखंड बहाल केले जात असल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला आहे. राज्य शासनाला अदानी टोटल गॅस लि.साठी जागा द्यायची होती तर ती राज्य सरकारची द्यायची असती. तशी मागणी त्यांनी केली होती. राज्य सरकारच्या यंत्रणेने जागा देण्यास नकार दिल्याची माहिती असून महापालिका ही स्थानिक स्वराज्य संस्था असून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आर्थिक हितास बाधा आणणे हे नगरसेवकांच्या अपात्रतेचे कारण ठरु शकते. त्यास प्रशासनाने कशी मान्यता दिली असा मुख्य मुद्दा उपस्थित केला जात आहे.




### सामान्य लोकांच्या जीवाशी खेळ

नजीकच पोलिस क्वॉर्टर असताना सार्वजनिक सुरक्षेशी तडजोड का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. सिव्हिल लाईन, गौरक्षण रोड यांसारख्या दाट लोकवस्तीच्या व व्हीआयपी भागात हाय-प्रेशर गॅस स्टेशन उभारताना अग्निशमन दल आणि ट्रॅफिक पोलिसांची एन ओ सी न घेता परवानग्या देणे नागरिकांच्या जीवाशी खेळणे नाही का ?. शहरातील अत्यंत मौल्यवान भूखंड एका खाजगी बड्या उद्योगाला नाममात्र/ सवलतीच्या दरात देताना महापालिकेच्या उत्पन्नाचे आणि सार्वजनिक हिताचे नुकसान का केले जात आहे. सर्वसामान्य अकोलावासियांच्या समस्यांवर महिनोनमहिने धूळ खात पडणाऱ्या फाईल्स अदानी गॅसच्या बाबतीत मात्र 'स्पेशल फास्ट ट्रॅक'वर का धावत आहेत.



# 13 वर्षांखालील मुलांना ऑनलाईन गेमिंग प्लॅटफॉर्मवर खाती उघडण्यास बंदी!

## ऑनलाइन गेमिंगला पालकांची संमती अनिवार्य

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**नवी दिल्ली :** एका प्रस्तावित खासगी विधेयकानुसार, १३ वर्षांखालील मुलांना पालकांच्या पडताळणी केलेल्या संमतीशिवाय सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेमिंग प्लॅटफॉर्मवर खाती तयार करण्यावर बंदी घातली जाऊ शकते, तसेच प्लॅटफॉर्मना अल्पवयीन मुलांचा मागोवा घेणे, त्यांची माहिती गोळा करणे किंवा त्यांना वैयक्तिकृत जाहिरातींद्वारे लक्ष्य करण्यास मनाई केली जाऊ शकते. पालकांच्या पडताळणीकृत संमतीशिवाय १३ वर्षांखालील लहान मुलांना आता सोशल मीडिया आणि ऑनलाईन गेमिंग



प्लॅटफॉर्मवर खाती उघडण्यावर बंदी घातली जाऊ शकते. तसेच, या डिजिटल प्लॅटफॉर्म्सना अल्पवयीन मुलांचे ट्रॅकिंग, प्रोफाइलिंग करणे किंवा त्यांच्यावर आधारित वैयक्तिक जाहिराती दाखवण्यावर रोख लावली जाऊ शकते. अशा अनेक महत्त्वाच्या तरतुदी असलेले एक खासगी विधेयक संसदेत मांडण्यात आले आहे. 'द सेफगार्डिंग हेल्दी इंटरनेट एन्व्हायर्नमेंट्स फॉर लिटल डिजिटल-नेटिव्ह्स' विधेयक, २०२५ मध्ये अल्पवयीन मुलांसाठी उपलब्ध असलेल्या प्लॅटफॉर्म्सवर वय-पडताळणी यंत्रणा अनिवार्य करण्याची शिफारस करण्यात आली आहे. याशिवाय, पालकांसाठी 'पेरेंटल-कंट्रोल डॅशबोर्ड'ची सुविधा देण्याचा प्रस्ताव आहे. या माध्यमातून पालकांना मुलांच्या ऑनलाईन हालचालींवर लक्ष ठेवणे, प्रायव्हसी सेटिंग्ज व्यवस्थापित करणे आणि स्क्रीन टाईम मर्यादित करणे शक्य होईल.

### अश्लील साहित्य आणि जाहिरातींवर बंधने

'शील्ड' विधेयकात १८ वर्षांखालील प्रत्येक व्यक्तीला 'बालक' म्हणून परिभाषित करण्यात आले असून, सोशल मीडिया, ऑनलाईन गेमिंग प्लॅटफॉर्म आणि इतर डिजिटल मध्यस्थ संस्थांवर बालसुरक्षेशी संबंधित विशेष जबाबदाऱ्या सोपवण्याचा प्रस्ताव आहे. यामध्ये मुलांचे ट्रॅकिंग, प्रोफाइलिंग किंवा त्यांच्यासाठी केंद्रित केलेल्या वैयक्तिक जाहिरातींवर पूर्ण बंदी घालण्याची मागणी केली आहे. तसेच, मुलांना अश्लील साहित्य, जुगार, बनावट सट्टेबाजी, हिंसक किंवा जहालवादी विचारसरणीची माहिती आणि अंमली पदार्थांशी संबंधित सामग्रीपासून दूर ठेवण्यासाठी प्लॅटफॉर्म्सना ठोस पावले उचलावी लागतील.

## हा थेट सुप्रीम कोर्टालाच धमकीवजा संदेश आहे का ?

**मुंबई:** 'देशातील तरुणांना आणि विद्यार्थ्यांना भेटायला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे वेळ नाही, मात्र फुटून गेलेल्या गद्दार खासदारांना भेटायला त्यांच्याकडे वेळ आहे. गद्दारांना 'मी पाठीशी आहे' असे सांगून मोदींनी एक प्रकारे सर्वोच्च न्यायालयालाच धमकीवजा संदेश दिला आहे का?' असा थेट आणि खळबळजनक सवाल शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी उपस्थित केला आहे. मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी देशातील सद्यस्थिती आणि पंतप्रधानांच्या भूमिकेवर तीव्र संताप व्यक्त केला. गेल्या दोन महिन्यांपासून जगभरात आणि देशात 'झेनझी' पिढीने सरकारला कसे गुडघ्यावर आणले आहे, याचा संदर्भ देत ठाकरे म्हणाले, 'विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर लाठीचार्ज झाला, अत्याचार झाले, ज्यामुळे जालियानवाला बाग हत्याकांडाची आठवण आली. तरीही या विद्यार्थ्यांशी कुणीही संवाद साधत नाही.

# अकोला सट्टा विश्वात खळबळ

## ओमप्रकास का लाल 'राकेश' बेनकाब !

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला :** शहरातील क्रिकेट सट्टेबाजीच्या काळ्या धंद्यातून एक खळबळजनक प्रकार समोर आला असून, नामांकित सट्टेबाज ओमप्रकास का ला 'राकेश' याने क्रिकेट बुकी आणि खेळाडूंना लाखो रुपयांचा चुना लावल्याचे उघडकीस आले आहे. बेटिंग घेतल्यानंतर आणि खायवाडी केल्यानंतर पैसे देण्यास टाळाटाळ करणाऱ्या या सट्टेबाजामुळे सध्या अकोल्याच्या सट्टा आणि व्यापारी वर्गात प्रचंड भूकंप आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राकेशने क्रिकेट मॅचवर लाखो रुपयांचे बुकिंग तर केले, मात्र पैसे देण्याची वेळ येताच तो रफूचक्कर झाल्याची माहिती आहे. त्याने बाजारात अनेक लोकांचे पैसे अडकवून ठेवले असून, वसुलीसाठी आता इतर बुकीच त्याचा शोध घेत आहेत. लाखोंच्या या हेराफेरीमुळे सट्टा बाजारातील गणिते पूर्णपणे कोलमडली असून वसुली करणाऱ्यांमध्ये तीव्र घबराट पसरली आहे.सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, हा सट्टेबाज केवळ मोठ्या व्यापाऱ्यांनाच नव्हे, तर शाळकरी आणि अल्पवयीन मुलांनाही क्रिकेट सट्ट्यांच्या गर्तेत ढकलत होता. निष्पाप मुलांना या दलदलीत ओढून त्यांचे भविष्य उद्ध्वस्त करण्याचा हा धोकादायक प्रकार अत्यंत गंभीर मानला जात आहे. या ओमप्रकास के लाल असलेल्या राकेश कोणाला बाजऱ्याची आवडणारी रोटी कोण खाऊ घालत आहे याचा ही शोध तपास यंत्रणांनी करण्याची गरज आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेला हा काळा धंदा नेमका कोणाच्या आशीर्वादाने फोफावला, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत.

## बस 100 फूट खाली कोसळली; 8 जण ठार

**चंबा:** हिमाचल प्रदेशमधील चंबा जिल्ह्यात बैरागढ-चंबा मार्गावर आज सकाळी भीषण अपघात झाला. एक खासगी बस बैरागढहून चंबाकडे जात असताना, देविकोठीजवळील चालुज वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने रस्त्यावरून खाली कोसळली आणि थेट १०० फूट खाली असलेल्या दुसऱ्या रस्त्यावर जाऊन पडली. प्राथमिक माहितीनुसार, या भीषण अपघातात बसचालक आणि वाहकासह एकूण आठ जणांचा मृत्यू झाला आहे. तसेच, जखमींपैकी सुमारे सात प्रवाशांची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. 'शर्मा ट्रॅव्हल्स'ची बस आज सकाळी साडेसहाच्या सुमारास बैरागढहून चंबाकडे निघाली होती. अवघे तीन किलोमीटरचे अंतर कापल्यानंतर, चालुज वळणाजवळ चालकाचे नियंत्रण सुटल्याने बस खाली कोसळली.






# सराईत घरफोड्यांच्या मुसक्या आवळल्या

## दोन आरोपी अटकेत, सात घरफोडीचे गुन्हे उघड



**मूर्तिजापूर :** मूर्तिजापूर शहर व परिसरात गेल्या काही दिवसांपासून बंद घरांना लक्ष्य करून घरफोडी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्यात मूर्तिजापूर शहर पोलिसांना मोठे यश आले आहे. पोलिसांनी दोन संशयित आरोपींना अटक करून त्यांच्याकडून १३.६०० ग्रॅम सोने, ४ लाख १४ हजार ७५० रुपये रोख तसेच दोन मोबाईल फोन असा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपींच्या चौकशीत मूर्तिजापूर शहरातील तब्बल सात घरफोडीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. मूर्तिजापूर शहर व परिसरात रात्री तसेच दिवसाच्या वेळी बंद असलेली घरे हेरून घरफोडी करणाऱ्या टोळीचा पोलिसांनी पर्दाफाश केला. या कारवाईमुळे घरफोडीच्या घटनांनी त्रस्त झालेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**पोलिसांच्या कामगिरीचे कौतुक**

सराईत घरफोडी करणाऱ्या आरोपींचा शोध घेऊन सात गुन्हे उघडकीस आणल्याबद्दल तपास पथकाच्या कामगिरीचे कौतुक करण्यात आले आहे. सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा छडा लावण्यासाठी तपास पथकाने केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक साहेब यांच्याकडून तपास पथकास २५ हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे.

**न्यायालयीन कोठडी, तपास सुरू**

अटक करण्यात आलेल्या दोन्ही आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने दिलेल्या पोलीस कोठडी रिमांडदरम्यान पोलिसांनी आरोपींची सखोल चौकशी केली. या चौकशीत मूर्तिजापूर शहरातील आणखी घरफोडीच्या घटनांबाबत महत्त्वाची माहिती समोर आली असून, पोलिसांनी तब्बल सात गुन्ह्यांची उकल केली आहे. आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत शेळके तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तपास पथकात सुरेश पांडे, नंदकिशोर, पोलीस हवालदार सचिन दांदळे, जिवन अंभोरे, पोलीस कॉन्स्टेबल सचिन दुबे, रोशन लडके, गजानन खेडकर, नामदेव आडे व पवन इंगोले यांचा सहभाग होता. तसेच अकोला येथील सायबर पोलिसांच्या पथकानेही तांत्रिक मदत केली. अर्चित चांडक यांच्या हस्ते मूर्तिजापूर येथील घरफोडी प्रकरणाचा तपास कौशल्यपूर्णरीत्या पूर्ण करून आरोपीला अटक तसेच मुद्देमाल जप्त करणारे ठाणेदार धर्मेंद्र जोशी यांना उत्कृष्ट कामगिरीबद्दल २५ हजार रुपयांचा रोख पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**तपासाची चक्रे वेगाने फिरविली**

शहर व परिसरात वाढलेल्या घरफोडीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरविली. गुन्ह्यांचा तपास सुरू असताना परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती तसेच पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध घेण्यात आला. तपासादरम्यान मिळालेल्या धाग्यांवरून पोलिसांनी दोन आरोपींना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये पंकज राजू गोंडाणे (वय २९, रा. चौरे नगर, सुदर्शन रोड, अमरावती; सध्या रा. पुंडसे, ता. वाडा, जि. पालघर) आणि सागर जनार्दन गोगटे (वय ३७, मूळ रा. गांधी चौक, अमरावती; सध्या रा. मोठा मारोती, कारंजा, जि. वाशिम) यांचा समावेश आहे.

**सात गुन्ह्यांतील मुद्देमाल हस्तगत**

पोलिसांनी केलेल्या तपासात विविध सात घरफोडीच्या गुन्ह्यांतील मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. यामध्ये किशोर डींगाबर विधाते, रा. आदर्श कॉलनी यांच्याकडील गुन्ह्यातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम, रेंगाळाव शामराव खांडेकर, रा. डागा लेआउट यांच्याकडील रोख रक्कम, केशव रामराव वाकोडे, रा. तिडके नगर यांच्याकडील सोने व रोख रक्कम, सुजाता प्रशांत नंदेधर, रा. वडरपुरा यांच्याकडील सोन्याचा मणी व रोख रक्कम, सचिन गजानन जाधव, रा. गोयकार नगर यांच्याकडील सोने व रोख रक्कम, नरेश नेभनदास मेघाणी, रा. समता नगर यांच्याकडील रोख रक्कम तसेच माणिक महादेव मेहेरकर, रा. सारडा लेआउट यांच्याकडील सोने व रोख रक्कम असा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे.

हस्तगत केलेल्या मुद्देमालाची एकूण किंमत लाखो रुपयांच्या घरात असून, त्यामध्ये १३.६०० ग्रॅम सोने, ४ लाख १४ हजार ७५० रुपये रोख आणि दोन मोबाईल फोन यांचा समावेश आहे.

# पोपटखेड धरणाचे दोन गेट उघडले; नदीकाठच्या 29 गावांना सतर्कतेचा इशारा

वि. प्रतिनिधी ८ ऑगस्ट



**अकोट :** सातपुडा पर्वतरांगांमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पोपटखेड धरणातील पाणीसाठ्यात क्षणीय वा ढझाली आहे. परिणामी, धरणाची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी शुक्रवारी (दि. ७) सायंकाळी धरणाचे दोन गेट उघडण्यात आले असून, धरणातून प्रति सेकंद २१.५४ घनफूट पाण्याचा विसर्ग सुरू करण्यात आला असल्याची माहिती पोपटखेड धरण लघु पाटबंधारे विभागाच्या अभियंत्यांनी दिली.

धरणातून पाण्याचा विसर्ग सुरू झाल्याने नदीपात्रातील पाण्याची पातळी वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे नदीकाठच्या तब्बल २९ गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून, नागरिकांनी नदीकाठावर जाणे टाळावे तसेच जनावरे व शेतीसंबंधित साहित्य सुरक्षित ठिकाणी हलवावे, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

सध्या सातपुडा परिसरात सुरू असलेल्या पावसामुळे धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. त्यामुळे परिस्थितीवर पाटबंधारे विभागाकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत असून, आवश्यकतेनुसार विसर्गात वाढ किंवा बदल करण्याचा निर्णय घेतला जाऊ शकतो, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, धरणाचे गेट उघडण्यात आल्यानंतरही अनेक गावांमध्ये या संदर्भातील माहिती वेळेत पोहोचत नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे प्रशासनाने अधिक प्रभावी जनजागृती मोहीम राबवून ध्वनिक्षेपक, सामाजिक माध्यमे आणि ग्रामपंचायत यंत्रणेच्या माध्यमातून नागरिकांना सतत सूचना द्याव्यात, अशी मागणी नदीकाठच्या गावांतील नागरिकांकडून करण्यात येत आहे.पावसाचा जोर कायम राहिल्यास धरणातील जलसाठा आणखी वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासन व पाटबंधारे विभागाकडून जारी करण्यात येणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# जन्म दाखल्यासाठी विशेष शिबिर घेण्याची मागणी; महसूल विभाग व नगरपरिषदेने घ्यावा पुढाकार

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शहरातील नागरिकांना जन्मदाखले उपलब्ध करून देण्यासाठी महसूल विभाग आणि नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने विशेष शिबिर आयोजित करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच स्वर्गीय माजी मुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त राज्यभर विविध उपक्रम होत आहे. या पार्श्वभूमीवर शहरातही नागरिकांच्या प्रशासकीय समस्या सोडविण्यासाठी विशेष 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरा'च्या माध्यमातून नागरिकांना आवश्यक सेवा उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत जन्मदाखल्याच्या समस्येकडेही प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार जन्मनोंदणी व जन्मदाखल्याशी संबंधित प्रक्रियेला महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे नागरिकांना कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रियेची माहिती देणे आणि ज्यांच्याकडे आवश्यक कागदपत्रे नाहीत, त्यांना नियमांनुसार पर्यायी कागदपत्रे व प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करणे, ही प्रशासनाची महत्त्वाची भूमिका ठरू शकते.

'प्रशासन आपल्या दारी' या भावनेतून महसूल विभाग आणि नगरपरिषदेने पुढाकार घेतल्यास अनेक वर्षांपासून जन्मदाखल्यापासून वंचित असलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो.

> आज विविध शासकीय कामांसाठी जन्मदाखल्याची आवश्यकता भासत आहे. त्यामुळे शासनाने अशा नागरिकांना अनावश्यक अडचणींचा सामना करावा लागू नये याची काळजी घेत, उपलब्ध पुरावे व साक्षीदारांच्या आधारे त्यांना जन्मदाखले सुलभ पद्धतीने उपलब्ध करून द्यावेत.
>
> **अहमद खान उर्फ अम्मु,** समाज सेवक सोनोरी

> प्रशासनाने नागरिकांच्या अडचणी लक्षात घेऊन मानवी दृष्टिकोनातून निर्णय घ्यावा. मनमानी नियम व अनावश्यक अडथळे निर्माण केल्यास नागरिकांच्या न्याय्य हक्कांसाठी गांधीवादी मार्गाने लोकशाही पद्धतीने आंदोलन उभारण्यात येईल."
>
> **कृष्णराव गावंडे**
> सामाजिक कार्यकर्ता मूर्तिजापूर

# तोष्णीवाल ले-आऊट मधील अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला :** तोणीवाल ले-आऊट येथील नागरिकांच्या प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने मनपा आयुक्त यांच्या आदेशान्वये तसेच सहा.आयुक्त राजेश सरप यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितीत 6 ऑगस्ट 2026 रोजी अकोला महानगरपालिकेच्या पुर्व क्षेत्रातील तोष्णीवाल ले-आऊट मधील अनधिकृत/अतिक्रमीत स्पोर्ट टर्फ व रेस्ट्रॉरंट वर क्षेत्रिय कार्यालय पुर्व व अतिक्रमण विभाग यांचेव्दारे निष्कासनाची कार्यवाही करण्यात आली आहे. या कार्यवाहीत सहा. अतिक्रमण निर्मुलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे प्रविण मिश्रा, राहुल राऊत, कनिष्ठ अभियंता अक्षय बोर्डे तसेच पुर्व झोन कार्यालयाचे आणि अतिक्रमण विभागातील कर्मचा-यांची उपस्थिती होती.



# उमेश पवार भाजप अनुसूचित जमाती मोर्चा प्रदेश उपाध्यक्षपदी



वि. प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोट :** भारतीय जनता पक्षाच्या अनुसूचित जमाती मोर्चाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी अकोला जिल्ह्यातील आदिवासी समाजाचे सक्रिय कार्यकर्ते तथा माजी आघाडी प्रमुख उमेश पवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील आदिवासी समाजामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध सामाजिक व आदिवासी संघटनांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. आदिवासी समाजाच्या विविध प्रश्नांसाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला आहे. ही नियुक्ती करताना आमदार रणधीर सावरकर, अनुसूचित जमाती मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष डॉ. देवराव होळी, खासदार अनुप धोत्रे, पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर, आमदार प्रकाश भारसाकळे, संघटन उपाध्यक्ष डॉ. उपेंद्र कोठेकर, आमदार हरीश पिंपळे, जिल्हा प्रभारी आमदार प्रवीण पोटे, नितीन भुतडा भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर तसेच विजय अग्रवाल यांच्याशी चर्चा व विचारविनिमय करण्यात आला.

# अकोट रोटरी क्लब ऑफ व्हिजनच्या अध्यक्षपदी संदीप भुस्कट तर अभिजीत अग्रवाल सचिवपदी

प्रतिनिधी ८ ऑगस्ट



**अकोट :** रोटरी क्लब ऑफ अकोट व्हिजनचा वर्ष २०२६-२०२७ चा नूतन अध्यक्ष, सचिव व इतर पदाधिकाऱ्यांचा 'राजतिलक' पदग्रहण सोहळा उत्साहात झाला. नूतन अध्यक्ष संदीप मधुकरराव भुस्कट आणि नूतन सचिव अभिजित सुरेश अग्रवाल यांनी पदाची सूत्रे स्वीकारली.

प्रमुख अतिथी म्हणून डीजीएनडी रो. निलेश परताणी अमरावती आणि अनिल गावंडे उपस्थित होते. तसेच विशेष अतिथी म्हणून अविनाश ठाकरे मा. अध्यक्ष, ओ.बी.सी. महामंडळ, म.रा. संतोष नरेडी, नंदकिशोर शेगोकार असिस्टंट गव्हर्नर २०२६-२७ व रिजनल चेअरमन प्रामुख्याने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाली.आनंद भोरे आणि अतुल मालाणी यांनी आपल्या कार्यकाळातील सामाजिक कार्याचा आढावा सादर केला व नूतन पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.नूतन अध्यक्ष संदीप भुस्कट यांनी आगामी वर्षात रोटरीच्या माध्यमातून अकोट शहरात विविध नाविन्यपूर्ण सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यामध्ये दृष्टी दान प्रकल्प,प्लॅस्टिक सर्जरी कॅम्प आदी. अनिल गावंडे यांनी रोटरी व्हिजनच्या कार्याचे कौतुक करत लोकजागर मंच आपल्या नेहमी पाठीशी उभा आहे, नोमिनी निलेश प्रताणी रोटरी ची माहिती देत नूतन अध्यक्षांना शुभेच्छा दिल्या. अभिजित अग्रवाल यांनी उपस्थितांचे आभार मानले.या सोहळ्याला संजय बोरोडे, अनंत काळे यांच्यासह रोटरी परिवार, कार्यक्रमाचे यशस्वीते करिता किरण गुहे, प्रविण बनसोड, दिपक तळोकार, मंगेश चिखले, अरुण हिंगणकर,अक्षय शेगोकार, विजय नवले, सचिन मारु, चेतन उपासे , जयेश महानकर, बाबुराव झामरे, संदिप बोबडे, प्रशांत खोडके, उमेश पवार , अतुल भिरडे,डॉ.मयुर व्यवहारे, नितीन शेगोकार, विजय भोरे, माधुरी लहाने, शिरीष वंजारा येऊल, डॉ.शितल गावंडे, प्रशांत जवंजाळ, सचिन भुस्कट,संदेश रोडे,शंकर जांभूळकर यांनी प्रयत्न केले.

# राजकमल चौक रस्त्याचे काम कासवगतीने नागरिकांसाठी ठरले त्रासदायक



प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला :** शहरातील विकास कामे रेंगाळतात का असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. राजकमल चौकातील रस्त्याच्या कामाची कासवगती नागरिकांसाठी त्रासदायक ठरते आहे. रस्त्याच्या एका बाजूला काँक्रीटीकरण झाले आहे. आणि दुसरी बाजू तशीच ठेवल्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची गैरसोय होत आहे. रात्रीच्या वेळी अंदाज येत नाही. कामाला गती द्यावी अशी मागणी आहे.

या रस्त्यावर कृषी उत्पन्न बाजार समिती आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची वाहने मोठ्या संख्येने येतात. या रस्त्यावर रहदारी मोठ्या प्रमाणात आहे. या वाहनांना ये जा करताना अडचणी निर्माण होत आहे. रस्त्याचे काम तातडीने मार्गी लावावे अशी मागणी आहे.

# अवैध धंद्यांचे 'हब' बनलेल्या आलेगावकडे स्थानिक गुन्हे शाखेचे दुर्लक्ष?

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**पातूर :** पातूर तालुक्यातील आलेगाव परिसरात गावठी दारू, मटका-जुगार आणि इतर अवैध व्यवसायांबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गावठी दारूमध्ये आरोग्यास घातक अथवा विषारी द्रव वापरला जात असल्याच्या आरोपांचीही चर्चा असल्याने प्रशासनाने हा विषय गांभीर्याने घेण्याची गरज आहे.

विशेष म्हणजे, अवैध धंद्यांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी असलेल्या चान्नी पोलीस स्टेशनच्या कार्यपद्धतीवरच आता नागरिकांकडून प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. अधूनमधून कारवाई होते, काही व्यक्तींवर गुन्हे दाखल होतात; मात्र त्यानंतर पुन्हा त्याच परिसरात अवैध व्यवसाय सुरू होत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे ही कारवाई कायमस्वरूपी नियंत्रणासाठी आहे की केवळ कागदी आकडेवारी वाढविण्यासाठी? असा सवाल उपस्थित होत आहे.

**स्थानिक गुन्हे शाखेला आव्हान—'अवैध धंदे थांबवून दाखवा!'**

आलेगाव परिसरात अवैध व्यवसाय सुरू असल्याच्या तक्रारी खऱ्या असतील तर स्थानिक गुन्हे शाखेने केवळ छापेमारीपुरती कारवाई न करता या धंद्यांच्या मुळापर्यंत पोहोचण्याची गरज आहे. पैसा कुठून येतो, माल कुठून येतो, विक्रीचे जाळे किती मोठे आहे आणि या व्यवसायामागे आणखी कोण आहेत, याचा तपास झाला पाहिजे.

अवैध धंदे सुरूच राहणार असतील तर पोलिसांच्या कारवाईचा नेमका परिणाम काय? आलेगाव अवैध दारूधंद्यांचे 'हब' बनत असेल तर स्थानिक गुन्हे शाखा नेमकी काय करत आहे? कारवाईनंतरही धंदे पुन्हा सुरू होत असतील तर त्याला जबाबदार कोण? अशी विचारणा होत आहे.

## कारवाईच्या कार्यपद्धतीवर




**विषारी द्रवाच्या आरोपाची स्वतंत्र तपासणी होणार का?**

गावठी दारूमध्ये विषारी अथवा आरोग्यास घातक द्रव वापरल्याच्या चर्चेने प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. दारूचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करण्यात आली आहे का? संबंधित ठिकाणांहून नमुने जप्त करून त्यांची रासायनिक तपासणी का करण्यात येऊ नये? या प्रश्नाचे उत्तर पोलिस प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

**कारवाई होते, मग धंदे पुन्हा सुरु कसे होतात?**

अवैध दारूधंद्यांवर कारवाई करूनही काही दिवसांत पुन्हा व्यवसाय सुरू होत असेल, तर स्थानिक गुन्हे शाखेची माहिती यंत्रणा नेमकी किती प्रभावी आहे? अवैध धंदे चालविणाऱ्यांची संपूर्ण साखळी पोलिसांच्या रडारवर आहे का? कारवाईनंतर त्यांच्यावर सातत्याने नजर ठेवली जाते का? असे अनेक प्रश्न नागरिक विचारत आहेत.

# आत्मा समितीच्या सदस्यपदी आखरे



**हिवरखेड :** वारखेड येथील रहिवाशी पद्माकर आखरे यांची कृषी विभाग तेल्हारा तालुका आत्मा समितीच्या सदस्यपदी आत्माचे तालुका अध्यक्ष रुपेश राठी यांनी नियुक्ती केली. त्यांच्या निवडीचे श्रेय पालकमंत्री आकाश फुंडकर, आमदार प्रकाश भारसाकळे यांना देतात.

आत्मा च्या माध्यमातून कृषी विषयक योजना राबविण्यात येतात. या भागातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल. या दृष्टीने आखरे यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. या भागातील शेतकऱ्यांना फायदा निश्चितपणे होईल असा विश्वास व्यक्त केला जात आहे. कृषी विषयाचे अभ्यासक म्हणून पद्माकर आखरे परिचित आहे.


## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट यांचे न्यायालयात**

प्रोसेस क. 2836/२०२६ — एम.जे.सी. क. २००/२०२६

दिनांक ०५/०८/२०२६ — चौकशी तारीख - ११/०९/२०२६

**अर्जदार** - १. श्रीमती. नैना अरुणराव देशमुख, वय-५० वर्ष, रा. केशवराज वेटाळ अकोट, ता. अकोट, जि. अकोला २. वैदेही अरुण देशमुख, (लग्नानंतरचे नाव वैदेही अनिकेत पस्टारीया) वय-२६ वर्ष, रा. वार्ड क. १ जयप्रकाश नागयण वार्ड, गोलापुग, हरदा, मध्यप्रदेश.

**विरूध्द**

गैरअर्जदार :- कोणीही नाही

सर्वत्र लोकांना सुचित करण्यात येते की, वरील अर्जदार यांनी इंडियन सक्सेशन ॲक्ट चे कलम ३७२ अंतर्गत वि. २रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर), अकोट, जिल्हा अकोला यांचे न्यायालयात वारस हक्क प्रमाणपत्र (Succession Certificate) मिळणेकरीता अर्ज केला आहे.

अर्जदार हे वरील पत्यावरील कायम रहिवासी असून अर्जदार क. १ चे पती व अर्जदार क. २ चे वडील नामे अरुण रावसाहेब देशमुख हे आपले संपूर्ण जिवनकाळात केशवगज वेटाळ, अकोट ता. अकोट जि. अकोला येथेच राहते व तेथेच दि. ०८/०२/२०२६ रोजी मयत आले आहेत. तसेच मयत अरुण रावसाहेब देशमुख यांनी आई नामे श्रीमती. सुमन रावसाहेबत देशमुख हया दि. १४/०६/१९९९ रोजी अकोट ता. अकोट जि. अकोला येथे मयत झाल्या आहेत तसेच मयत अरुण रावसाहेब देशमुख यांना अर्जदार क. १ व २ यांचे व्यतिरीक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाही.

मयत नामे अरुण रावसाहेब देशमुख यांच्या नावे आय.डी.बी.अय. बँक शाखा अकोट येथे खाते क. ५४११००१०००१३९४ असून सदर खात्यामध्ये एकुण रक्कम रु.३,०८,७४३/- (अक्षरी रक्कम रुपये तिन लाख आठ हजार सातेश त्रेचाळीस रुपये फक्त) रक्कम जमा आहे. मयत अरुण रावसाहेब देशमुख यांचे खात्यामधील जमा असलेली रक्कम मिळण्याकरिता अर्जदार यांनी वि. न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सर्वत्र लोकाां सुचित करण्यात येते की, सदरचे अर्जासंबधी इतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास किंवा ते स्वतः वारस असल्यास, सदरची नोटीस वृतपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन ३० दिवसाचे आंत, त्यांनी उपरोक्त न्यायायालयात स्वतः अथवा वकीलामार्फत हजर राहावे अन्यथा सदरचे प्रकरण नियमानूसार निकाली काढण्यात येईल. करीता आज दिनांक ०५/०८/२०२६ रोजी माझे सहीने व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले.

**आदेशानुसार,**
सहायक अधिक्षक (न्यायीक)
दिवाणी न्यायालय (व.स्तर), अकोट, जि. अकोला



अकोला महानगर पालिकेचे प्रवेश द्वार आणि वास्तू तिरंग्याच्या रंगांनी झळाळत आहे. भारतीय स्वातंत्र्य दिनाची तयारी महानगरात सुरू झाली आहे. राष्ट्रध्वजाचा तिरंगी रंग विविध ठिकाणी उठून दिसू लागला आहे. स्वातंत्र्य दिनाला आठवडा राहिला असल्याने जय्यत तयारी सुरू झाली आहे. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी तयारीचा आढावा घेतला.

# शहरात बाप्पाच्या आगमनाची वाट खडतर

## पालखी व कावड मंडळाच्या शिवभक्तांना सुद्धा होईल त्रास

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला:** जुलै महिन्याच्या मध्यात जिल्ह्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरभरातील रस्त्यांवर मोठ- मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यापूर्वीच शहरातील अनेक रस्त्यांची अवस्था खालावली होती. तर दुसरीकडे शहरातील डाबकी रोड गौरक्षण रोड परिसरातील रस्ते खोदून ठेवल्याने व रस्त्याचे काम अत्यंत कासव गतीने सुरू असल्याने परिसरातील नागरिकांची डोकेदुखी अद्यापही कायम आहे.

रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी नसल्याचे कारण देत पालिकेचे अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहेत. शहरातील रस्ते तर सोडा महापालिकेच्या प्रवेशद्वारासमोरच रस्त्यावर मोठे खड्डे निर्माण झाले आहेत यामुळे अनेकदा वाहन अपघात सुद्धा झाले आहेत.

शहरातील अनेक रस्ते खड्डयांनी भरलेले आहेत. १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सव सुरू होत आहे. तर या 13 तारखेपासून श्रावण महिना सुरू होत आहे श्रावण महिन्याच्या पहिल्या तसेच शेवटच्या सोमवारी पालखी व कावड निघत असल्याने शिवभक्तांना सुद्धा या खड्डयांच्या समस्येस सामोरे जावे लागेल. त्यामुळे या महिन्यात शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरणे हे महानगरपालिकेसाठी एक आव्हानात्मक काम बनले आहे.



### नागरिकांना होणारा त्रास कमी करण्याची मागणी

पावसाळ्यापूर्वीच शहरातील रस्त्यांवरील खड्डे भरण्याचे काम सुरू करणे अपेक्षित होते परंतु अद्यापही शहरातील रस्त्यांवरील खड्डे बुजविण्याच्या कामास सुरुवात झाली नसल्याचे दिसून येत आहे आहे. शहरभरातील इतर अनेक ठिकाणी मोठे खड्डे दिसत आहेत.



### पावसाळ्याच्या सुरुवातीला कामाला सुरुवात झाली

विशेष म्हणजे, संपूर्ण उन्हाळा संपल्यानंतर प्रशासनाने पावसाळ्याच्या सुरुवातीला शहरातील काही रस्त्यांच्या दुरुस्तीचे काम सुरू केले. उदाहरणार्थ डाबकी रोड, गौरक्षण रोड, खुलेनाट्यगृहासमोरील रोड चे काम आताही सुरूच आहे तर अनेक रस्त्यांची कामे जवळपास वर्षभरापासून प्रलंबित होती. महानगरपालिका प्रशासनाने मे महिन्याच्या अखेरीस हे काम सुरू केले आणि पावसाळ्यात वाहतूक थांबवण्यात आली.

# 18 वा श्री श्याम एकादशी संकीर्तन सोहळा उद्या

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला :** धार्मिक व सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेल्या श्री स्वार्थी श्याम परिवाराच्या वतीने श्रावण कृष्णपक्ष एकादशीनिमित्त १८ वा श्री श्याम एकादशी संकीर्तन सोहळा रविवार, ९ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा मंदिर, गीतानगर, अकोला येथे आयोजित करण्यात आला आहे.

या संकीर्तन सोहळ्यात हारे म्युझिकल ग्रुप, अकोलाच्या भक्तिमय सादरीकरणात प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय भजन गायक गोपाल शर्मा हारे (अकोला, मुंबई) तसेच ऋषिका ठाकूर (ग्वालियर) श्याम भजनांची सेवा सादर करणार आहेत. त्यामुळे श्यामप्रेमी भाविकांना भक्तिरसाचा आनंद घेता येणार आहे.





अकोला शहरात प्रथमच ऐतिहासिक महाभारत देखावा व श्री श्याम बाबा श्यामची मनमोहक झांकी झुल्यात स्थापित करून झुलनोत्सव संपन्न होणार आहे.

कार्यक्रमास श्री रामदेव बाबा एवं श्री श्याम बाबा सेवा समिती यांचा सहआयोजक म्हणून सहभाग लाभत आहे. शहरातील सर्व श्यामप्रेमी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संकीर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन गोपाल शर्मा हारे पदयात्री मित्र परिवार, अकोला यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# वृक्षारोपण, संवर्धनासाठी सामाजिक संस्थांनी मनपा प्रशासना सोबत येण्याचे आवाहन

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला:** पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा घटक असलेला वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे. आपल्या पाल्यांचे पुढील भविष्य पर्यावरणावरच अवलंबून असल्याने नागरिकांनी वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन या उपक्रमात सहभाग नोंदवावा असे आवाहन महापौर सौ.शारदा रणजीत खेडकर आणि स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांनी केले आहे.

अकोला महानगरपालिका क्षेत्रात वक्षारोपण व वृक्ष संवर्धन करण्याच्या दृष्टीने महापौर सौ.शारदा खेडकर यांच्या अध्यक्षतेखाली मनपा स्थायी समिती सभापती विजय अग्रवाल यांच्याव्दारे, भाजपा शहर अध्यक्ष तथा नगरसेवक जयंत मसने, उपमहापौर अमोल गोगे, नगरसेविका सौ.सुनिता अग्रवाल, सभागृह नेता पवन महल्ले यांच्या उपस्थितीत शहरातील सामाजिक संस्थेच्या पदाधिका-यांची बैठक झाली.





या बैठकीमध्ये वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे, मिया वॉकी ट्रॅक तयार करणे, पर्यावरणपूरक गणेशोत्सव यासह महानगरपालिका हरित क्षेत्रे सुसज्ज सोईसह सामाजिक संस्थांना दायित्व देणे या महत्वपुर्ण विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच या बैठकीमध्ये, वृक्ष लागणडसाठी जागा निश्चित करणे, वृक्षांची प्रजाती, वृक्ष पुरवठा करणे, वृक्ष लागवडसाठी खड्डे खणून देणे, उड्डाण पुलाच्या खालच्या जागेवर गार्डन तयार करून सौंदर्यीकरण करणे, वक्षारोपण करण्यासाठी गढ्ढे खणण्याकरिता दोन ट्रॅक्टर तयार करणे आदिंबाबत सखोल चर्चा करण्यात आली आहे.

या बैठकीमध्ये मनपा अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने, अकोला गार्डन क्लबचे निशीकांत बडगे, संजय शर्मा, संजय सेंगर, विजय ढवळे, अजय सेंगर, इंडियन मेडीकल असोसिएशनचे आशुतोष डाबरे, डॉ.निलेश कोरडे, आर.एस.एस.चे सुनील जाधव, भूषण बापट, ज्येष्ठ पत्रकार राजीव पिसे, रत्नाकर जोशी, युवा संघटनेचे सुरेश फुले, दत्ता भिसे, ऑल इंडिया इंस्टीट्यूट ऑफ डिजास्टर मिटीगशन अकोलाचे पायल टाले, इको फ्रेण्डली गणपती संघटनेचे शरद कोकाटे, मनपा उपायुक्त विजय पारतवार, मनपा कार्यकारी अभियंता अजय गुजर, सहा.नगररचनाकार मृणालिनी मानतकर, पर्यावरण व उद्यान विभागाचे अनिल बिडवे आदींची उपस्थिती होती.

# बोगस सोयाबीन बियाणे प्रकरणी आमदार हरीश पिंपळे आक्रमक

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** बोगस सोयाबीन बियाण्यांमुळे हजारो शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याच्या पार्श्वभूमीवर आमदार हरीश पिंपळे यांनी सुरुवातीपासूनच शेतकऱ्यांच्या बाजूने ठाम भूमिका घेतली असून, दोषींवर कठोर कारवाई करून प्रत्येक पीडित शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी आपला लढा सुरूच राहणार असल्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे.

बोगस बियाण्यांचा मुद्दा आमदार पिंपळे यांनी महाराष्ट्र विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात प्रभावीपणे उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. त्यानंतर त्यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष शेतात जाऊन पिकांची पाहणी केली. बियाणे उगवले नसल्याने तसेच पिकांची वाढ अपेक्षेप्रमाणे न झाल्याने शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या अडचणींची माहिती त्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतली आणि शासनाकडे पाठपुरावा सुरू केला. या प्रकरणी अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी, कृषी विभागाचे अधिकारी तसेच संबंधित बियाणे कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली. त्यानंतर आमदार पिंपळे यांनी आयुक्तांना पत्र देऊन संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली.

यासोबतच जिल्हा पोलीस अधीक्षक आर. चंद्रक यांच्याशी चर्चा करून दोषी कंपन्या व संबंधित विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली. याच अनुषंगाने आमदार हरीश पिंपळे यांच्या कार्यालयात तालुका कृषी अधिकारी दीपक तायडे, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी आणि संबंधित यंत्रणांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत बोगस बियाण्यांमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा घेण्यात आला तसेच पुढील कार्यवाहीबाबत दिशा निश्चित करण्यात आली. प्राथमिक माहितीनुसार, अनेक कंपन्यांच्या सोयाबीन बियाण्यांचे दोन ते तीन बॅग उगवले नसल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. काही कंपन्यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी बियाणे, खत व हरभरा बियाणे देऊन समेटाचा प्रयत्न केला आहे.

# शाळांचा परिसर गुटखा मुक्त करण्याची कारवाई



प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला:** शाळांच्या परिसरात गुटखा विक्रीला आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासन कारवाई करीत आहे. शुक्रवारी दुपारी मिशन उड़ान अंतर्गत भांडपुरा भागातील शाळा क्रमांक 2 नंबर जवळील सर्व पान टप-या हटवल्या. तसेच मारकेवाडी शाळेजवळ एका किराणा दुकानात छापा टाकून लाखो रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त केला.

जुने शहर पोलिसांनी ही कारवाई केली. शहरातील शाळांचा 200 मीटर परिसर गुटखा तंबाखू विक्रीकर प्रतिबंध राहणार आहेत. तंबाखू गुटखा विक्रीला आळा घालण्यासाठी कारवाई करण्यात येत आहे. कालच्या कारवाई मध्ये मोठ्या प्रमाणात गुटखा जप्त करण्यात आला.

# गाडगेबाबा समाधी मंदिराच्या सौंदर्यीकरणासाठी 25 कोटी मंजूर

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अमरावती :** भाजपा नेत्या माजी खा.नवनीत राणा यांनी आपल्या खासदारकीच्या कार्यकाळात अमरावती येथील श्री. संत गाडगे महाराज समाधी मंदिर संस्थानच्या सौंदर्यीकरणाकरिता व बांधकामाकरिता आपल्या विशेष प्रयत्नाने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस व महसुल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्याने 25 कोटी रुपयाचा निधी मंजुर करुन दिल्याबद्दल संस्थानच्या विश्वस्तांनी शंकर नगर येथील कार्यालयात येऊन अभिनंदन करुन मानले आभार मानले.

संस्थेचे अध्यक्ष बापुसाहेब देशमुख, सचिव प्रकाश महात्मे, वसंतराव बोधले व सागर देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. संत गाडगे महाराज हे केवळ एका समाजाचे नव्हे तर संपूर्ण मानवतेचे प्रेरणास्थान - संत गाडगे महाराजांचे समाधी स्थळ हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून या पवित्र स्थळाचा विकास, सौंदर्यीकरण आणि जतन करणे ही आपली नैतिक जबाबदारी



आहे असे मत यावेळी माजी खा.नवनित राणा यांनी व्यक्त केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष बापुसाहेब देशमुख, सचिव प्रकाश महात्मे, वसंतराव बोधले, सागर देशमुख यांच्यासह संस्थानचे पदाधिकारी उपस्थित होते. उपस्थित विश्वस्तांनी संत गाडगे महाराजांच्या समाधी स्थळाच्या विकासासाठी मिळालेला निधी हा संपूर्ण विदर्भासाठी अभिमानाचा विषय असल्याचे सांगत मा. नवनित राणा यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले. संत गाडगे महाराजांचे समाधी स्थळ हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून या पवित्र स्थळाचा विकास, सौंदर्यीकरण व समाधी परिसर धार्मिक, सांस्कृतिक आणि पर्यटनदृष्ट्या विकसित व्हावा या उद्देशाने नवनित राणा यांच्या विशेष प्रयत्नाने व मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस व महसुल मंत्री व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सहकार्याने २५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना लाभ वितरण

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला:** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेत पहिल्या टप्प्यात अकोला जिल्ह्यातील 19 हजार 910 शेतकऱ्यांना

एकूण 169 कोटी 36 लाख रु. कर्जमुक्ती रकमेचा लाभ वितरीत करण्यात आला आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र शेतकऱ्याला कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळणार आहे. एकही पात्र शेतकरी या योजनेच्या लाभापासून वंचित राहणार नाही,



अशी ग्वाही राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी दिली आहे. मुंबई येथे सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते कर्जमुक्ती योजनेच्या ऑनलाईन लाभ वितरणास प्रारंभ करण्यात आला. शेतकरी क्षम, शेती समृद्ध आणि महाराष्ट्र अधिक प्रगत करण्याच्या उद्देशाने ही योजना शासनाने हाती घेतली आहे. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या दिशेने हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.अमरावती विभागात १ लाख ५८ हजार १४६ शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यात १,३७२.१७ कोटींचा लाभ, तसेच राज्यात पहिल्या टप्प्यात आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेल्या ६.२२ लाख शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांमध्ये ५,०२८ कोटींची रक्कम थेट जमा करण्यात आली

# गुरांमध्ये वाढतोय लम्पीचा प्रादुर्भाव

**खामगाव :** गुरांसाठी घातक मानला जाणारा लम्पी रोग पुन्हा डोके वर काढत असून, खामगाव तालुक्यातील काही भागांत त्याचा प्रादुर्भाव वाढत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

खामगाव तालुक्यातील काही गावांमध्ये गायी व बैलांमध्ये ताप, अंगावर गाठी येणे, भूक मंदावणे आणि अशक्तपणा अशी लम्पी रोगाची लक्षणे आढळून येत आहेत. या आजाराचा गुरांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, दूध उत्पादनातही घट होत आहे.

# 10 ऑगस्ट रोजी शहरात 'जगदंबा इव्हेंट'चे आयोजन!

## महिलांसाठी रक्षाबंधन अन् वेडिंग शॉपिंगची पर्वणी

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला :** अकोलेकर महिलांच्या पसंतीस उतरलेले आणि गेल्या १५ वर्षांची दैदिप्यमान परंपरा जपणारे 'जगदंबा इव्हेंट' घेऊन येत आहे 'लाइफस्टाइल फॅशन एक्झिबिशन' (राखी अँड वेडिंग स्पेशल)! हे भव्य प्रदर्शन १० ऑगस्ट २०२६ रोजी उत्सव मंगल कार्यालय, जठारपेठ, अकोला येथे सकाळी १०:०० ते रात्री ९:०० या वेळेत आयोजित करण्यात आले आहे.

रक्षाबंधन, आगामी लग्नसराई आणि सणासुदीच्या





पार्श्वभूमीवर महिलांना एकाच छताखाली मनसोक्त आणि प्रीमियम खरेदी करता यावी, यासाठी देशभरातील सर्वोत्कृष्ट डिझायनर्सचे स्टॉल्स अकोल्यात सजणार आहेत. सुरेख लखनवी ड्रेसेस, डिझायनर कुर्ता व कुर्तीजचे लेटेस्ट व्हरायटीज. मुंबईची ट्रेंडिंग डिझायनर ज्वेलरी आणि हैदराबादचे अस्सल 'हैदराबादी पर्ल्स'. पारंपरिक व क्लासिक साऊथ साड्यांचे आकर्षक कलेक्शन. घराच्या सौंदर्यात भर घालणारे होम डेकोरेशन आयटम्स आणि ऑल अबाउट लिनन्स. सणांसाठी खास 'लड्डू गोपाळ पोशाख', राखी व फेस्टिव्ह वेअर, ब्रायडल वेडिंग कलेक्शन आणि लेटेस्ट सिझन ट्रेंड्स. मुंबई, बंगळुरू, अहमदाबाद, सुरत, हैदराबाद, जयपूर आणि पुणे यांसारख्या प्रमुख शहरांतील नामांकित डिझायनर ब्रँड्स या प्रदर्शनात सहभागी होत आहेत.

### सणासुदीच्या खरेदीची उत्तम संधी दवडू नका!

१० ऑगस्ट रोजी उत्सव मंगल कार्यालय, जठारपेठ येथे आयोजित या एकदिवसीय 'जगदंबा इव्हेंट'ला अवश्य भेट द्या आणि आपल्या आवडीच्या खरेदीचा आनंद लुटा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# डॉ. अभय पाटील यांच्या कोअर कमिटीची नियोजन बैठक संपन्न

## पक्षप्रवेशाबाबत 15 ऑगस्टनंतर होणाऱ्या बैठकीत अंतिम निर्णय; पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मताला महत्त्व

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**अकोला :** डॉ. अभय पाटील यांच्या संभाव्य पक्षप्रवेशाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या कोअर कमिटीची महत्त्वपूर्ण नियोजन बैठक काल हॉटेल आर.जी. येथे संपन्न झाली. गेल्या चार-पाच दिवसांपासून डॉ. अभय पाटील हे एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना राजकीय वर्तुळात वेग आला आहे.



या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी आपल्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करूनच पुढील निर्णय घेण्याची भूमिका घेतली आहे. त्यानुसार काल झालेल्या कोअर कमिटीच्या बैठकीत आगामी राजकीय वाटचाल, कार्यकर्त्यांची भूमिका तसेच पुढील नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीत कोअर कमिटीतील अनेक सदस्यांनी आपली मते व मनोगते व्यक्त केली.

दरम्यान, १५ ऑगस्टनंतर लोकसभा क्षेत्रातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी बैठक आयोजित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या बैठकीच्या अनुषंगाने कोअर कमिटीतील सदस्यांना विविध जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. डॉ. अभय पाटील यांच्या पक्षप्रवेशाबाबतचा अंतिम निर्णय १५ ऑगस्टनंतर होणाऱ्या व्यापक बैठकीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा केल्यानंतरच घेण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

त्यामुळे डॉ. पाटील यांच्या पुढील राजकीय भूमिकेकडे अकोला लोकसभा क्षेत्रासह जिल्ह्यातील राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. कार्यकर्त्यांचा कौल घेऊनच पुढील राजकीय दिशा निश्चित केली जाणार असल्याने १५ ऑगस्टनंतरची बैठक महत्त्वाची ठरणार आहे.

# मन नदीत वाहुन गेलेला युवक 24 तासानंतर सापडला

प्रतिनिधी ८ ऑगस्ट

**हातरूण:** नदी ओलांडत असताना बैलगाडी खोल खड्डयात कोसळून पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याने चार बैलांचा मृत्यू झाला, तर शाहिद असिफ देशमुख (२५) हा युवक बेपत्ता होता. त्याच्यासोबत असलेल्या अबुतालेब या युवकाचा ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखून जीव वाचवला. ही घटना लोहारा येथील मन नदीत शुक्रवारी घडली होती. चोवीस तासानंतर शाहिदचा शोध लागला. शेतीचे काम आटोपून दोघे युवक बैलगाडीसह



घराकडे परतत होते. मन नदी ओलांडत असताना नदीपात्रात पोकलॅन्ड मशीनच्या सहाय्याने खोदण्यात आलेल्या सुमारे २० ते २० फूट खोल खड्डयात बैलगाडी अचानक गेली. त्यामुळे बैलगाडीने सलग तीन कोलांट्या घेत पाण्याच्या प्रवाहात वाहून गेली. या भीषण अपघातात चारही बैलांचा जागीच मृत्यू झाला, तर शाहिद असिफ देशमुख हा युवक पाण्याच्या वेगवान प्रवाहात वाहून गेला होता घटनेची माहिती मिळताच परिसरातील ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. उरळ पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून ग्रामस्थांच्या मदतीने बेपत्ता युवकाचा शोध सुरू केला असून, युद्धपातळीवर बचाव व शोधकार्य सुरू होता. आज सकाळ पासून भोई समाजातील लोकांनी व पिंजर येथील आपातकालिन शोध मोहिम सुरू केली होती.

24 तासानंतर शाहिद देशमुख सापडला. उरळ पोलिसांनी पंचनामा केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

शनिवार, दि.८ ऑगष्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com





# मुख्याधिकारी साहेब, व्यापारी संकुलात करा भ्रमण

# पार्कींगसह प्रसाधन गृहावर अतिक्रमण !

## *अतिक्रमण हटाव मोहीम खास *रस्त्याने घेतला मोकळा श्वास

**न.प.चा आला गाडा**
**गरीबांचे झोपडे मोडा**
**रस्त्यावरचे काढा**
**अन् पक्केही पाडा**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शहराला अतिक्रमणच्या विळाख्यातून बाहेर काढण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहिमेला दि. ५ ऑगस्टपासून सुरूवात करण्यात आली. मात्र काही अतिक्रमण धारकांनी दोन दिवसापासूनच स्वयंमस्फूर्तीने अतिक्रमण काढायला सुरूवात केली आहे. अतिक्रमण हटाव मोहिमेत रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात येत आहे. मात्र श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण अद्यापही नाही पाडले. त्यामुळे श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडा अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे. शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटल्यामुळे रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. तर ही मोहिम खास ठरत आहे. वाशीम शहरातील नगरपालीकेच्या आणि अनेक खासगी व्यापारी संकुलातील पार्किंगच्या जागेसह प्रसाधन गृहाच्या जागा गायब झाल्या आहेत. बहुतांश पार्किंग आणि प्रसाधन गृहाच्या जागेवर संबंधित व्यापारी संकुलाच्या मालकांनी दुकाने थाटली आहेत तर पालिकेने या प्रसाधन गृहाच्या जागा तत्कालीन पालिकेच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निकटवर्तीयांना दिल्याची चर्चा आहे.






शहरात सध्या अतिक्रमण हटाव मोहिम सुरू आहे. ही मोहिम जिल्हा प्रशासन पोलिस प्रशासन व नगर प्रशासनाच्या पुढाकाराने सुरू आहे. आता त्यांनी पुढाकार घेवून वाशीम शहरातील पालीकेच्या व खासगी व्यापारी संकुलातील पार्किंग सह प्रसाधनगृहाच्या सर्व जागा मोकळ्या कराव्यात अशी शहरवासीयांची मागणी आहे.वाशीम शहरामध्ये सर्व प्रथम रविवार बाजारातील खुल्या जागेवर पालीके ने रस्त्याच्या दुतर्फा व्यापारी संकुल बांधले. या व्यापारी संकुलाच्या मध्यभागी असलेल्या रस्त्याच्या कडेला पालिकेने प्रसाधनगृहे बांधली होती. तेव्हा रविवार बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात खुली जागा होती. आणि शहरात व ग्रामीण भागात वाहनांची संख्या पण मोजकी होती. कालांतराने वाशीम शहरातील बाजारपेठ वाढल्यामुळे पुन्हा २५ वर्षापूर्वी पालिका प्रशासनाने रविवार बाजार व बैलबाजाराच्या जागेवर बिओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारण्यासाठी पुढाकार घेतला. महात्मा फुले मार्केट मध्ये पार्किंगची व्यवस्था व प्रसाधनगृहाची व्यवस्था न केल्यामुळे आज महात्मा फुले मार्केटमध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याचे चित्र आहे. तसेच बैल बाजारातील व्यापारी संकुलाची सुद्धा हीच अवस्था आहे: या सर्व समस्या सोडविण्यासाठी आजपर्यंत पालिका प्रशासनाने व जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला नसल्याचा आरोप नागरिकांकडून केल्या जात आहे.

### अनेक रस्तेही केले गायब...

शहरात धनधागड्यांनी मोठ्यामोठ्या कमर्शियल कॉम्प्लेक्समधील शौचालयाच्या जागा गायब केल्या आहे तर अनेक ठिकाणचे रस्तेही गायब झालेचे प्रकार उघडकीस येत आहे. शहरात पक्के अतिक्रमण कधीच पडले नसून फक्त रस्त्यावरच्याच अतिक्रमणावर कारवाई करण्यात आली आहे.नगर पालिका फक्त गरिबांवरच कारवाई करीत असल्याचे अनेक वेळा उघडकीस आले आहे.त्यामुळे न.प. मुख्याधिकाऱ्यांनी कॉम्प्लेक्समध्ये भ्रमण करून गायब झालेल्या प्रसाधनगृहाच्या जागा व पार्किंगच्या जागा शोधाव्यात व त्यावरील अतिक्रमण काढावे अशी मागणी होत आहे.






# रस्त्यावरचे काढले, अन् पक्के नाही पाडले...

वाशीम शहर अतिक्रमणामुळे व अस्वच्छतेमुळे भकास झाले आहे. शहरातील रस्त्यांना अतिक्रमणाने घेरले असून त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. तर अस्वच्छतेने नागरिक त्रस्त झाले आहे. यावर उपाय म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर न.प. मुख्यधिकारी अरविंद मुंढे, उपमुख्यधिकारी वसंत पाटील, बांधकाम अभियंता निखील चव्हाण, पाणी पुरवठा अभियंता गजानन हिरेमठ, अधिक्षक राहुल मारकड, करनिरीक्षक स्वप्नील इंगोले, आरोग्य निरीक्षक सुदाम चव्हाण, लेखा अधिकारी योगेश मांदळे, करसंग्राहक मुन्ना खान, राम वानखेडे, शहर अभियान व्यवस्थापक पंडीत यासह न.प.चे कर्मचारी उपस्थित होते. शहराच्या विकासाच्या दृष्टीने वेगवेगळे पावले उचलत असून आता अतिक्रमण हटाव मोहिमेच्या माध्यमातून पुन्हा रस्त्यावर उतरल्या आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापासून अतिक्रमण हटाव मोहिमेला प्रारंभ झाला आहे. मात्र रस्त्यावरील अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर कायम स्वरूपी शहरातील पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी शहर वासियांकडून होत आहे. अतिक्रमण हटाव मोहिम ही नेहमी सारखी न राबविता कायम स्वरूपी राबवावी. कारण हे अतिक्रमण धारक पुन्हा काही दिवसानंतर जैसे थे करीत पुन्हा अतिक्रमण करतात. अतिक्रमण, सरकारी जागेवर केलेले पक्के अतिक्रमण कायम स्वयंमस्वरूपी काढण्याची मागणी होत आहे.





### शहराला समस्यांनी घेरले, अधिकाऱ्यांनी तारले...

भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे २४ तास पाणी देणे सोडा दहा दिवसातून एकदाही पाणी मिळत नाही. शहरातील रस्ते खड्ड्यात गेले असून भूमीगत गट्टार योजना गटारातच समाविली. ट्राफिक सिग्नल बंद अवस्थेत आहे. गुंठेवारीची खरेदी विक्री स्वाथासाठी बंद केली. यासह विविध समस्यांनी शहराला घेरले असतांना मात्र जिल्हाधिकारी, जिल्हा पोलिस अधीक्षक न.प.मुख्याधिकारी यांनी स्वच्छतेतून व अतिक्रमण हटाव मोहिमेतून शहराला तारायला सुरूवात केली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आदराचे स्थान निर्माण झाले आहे.

### अनेक वेळा राबविण्यात येते अतिक्रमण हटाव मोहिम...

शहराला अतिक्रमणच्या विळाख्यातून बाहेर काढण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहिम या पुर्वी ही अनेक वेळा राबविण्यात आली. मात्र अतिक्रमण हटविल्यानंतर काही दिवसातच पुन्हा जैसे थे परिस्थिती होते. अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायम स्वरूपी अतिक्रमण हटाव मोहिम राबवून श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी होत आहे.

## थोडक्यात

### रोजगाराभिमुख कौशल्य प्रशिक्षणातून युवकांना सक्षम करा

**वाशीम :** जिल्ह्यातील युवक-युवतींना रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक गरजा व उद्योग क्षेत्रातील मागणी लक्षात घेऊन कौशल्य प्रशिक्षण अभ्यासक्रम निश्चित करावेत. प्रशिक्षणातून रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यावर भर देणे आवश्यक आहे, असे निर्देश जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समितीची बैठक जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शहा, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक यशवीर कुमार, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी उत्तम शिंदे, मत्स्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त प्रियंका झोड, जिल्हा व्यवसाय व प्रशिक्षण संस्थेचे सचिन नकाते आदींची प्रमुख उपस्थिती होती. बैठकीत सन २०२६-२७च्या जिल्हा कौशल्य विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली.



## अविनाश गव्हाणकर यांची शिवसेना शहर सचिवपदी नियुक्ती !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने श्री. अविनाश केशवराव गव्हाणकर यांच्या पक्षातील कार्याची दखल घेत त्यांची शिवसेना शहर सचिव, वाशिम या पदावर नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीबद्दल पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.यावेळी जिल्हा प्रमुख बालाजीभाऊ वानखेडे, जिल्हा संघटक गजाननभाऊ देशमुख, तालुका प्रमुख गणेश इंगोले, शहर संपर्कप्रमुख गजानन भांदुर्गे, शहर प्रमुख गजानन जोगदंड, उपशहरप्रमुख देवीदास वानखेडे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

अविनाश गव्हाणकर यांच्या नियुक्तीमुळे वाशिम शहरातील पक्ष संघटन अधिक मजबूत होण्यास मदत होईल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

# पतीने केली गर्भवती पत्नीची हत्या!

**पतीसह सासू-सासऱ्यावर गुन्हे दाखल, पतीला अटक * पतीचे होते विवाहबाह्य अनैतिक संबंध**

● सिटी न्युज ब्युरो @ कारंजा ●

कारंजा पासून सहा किलोमीटर अंतरावर असलेल्या ग्राम शिवनगर येथे भारतीय सैन्यात कार्यरत असलेल्या लष्कर जवानाने आपल्या सात महिन्याची गर्भवती असलेल्या पत्नीची हत्या केल्याची घटना घडली असून यामुळं कारंजा तालुक्यात खळबळ उडाली आहे. मृत महिलेच्या भावाच्या फिर्यादीवरुन या प्रकरणी खुणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सैन्याच्या ६ व्या मराठा बटालियनमध्ये कार्यरत असलेला २९ वर्षीय पती ज्ञानेश्वर मदने आणि त्याच्या आईवडिलांना पोलिसांनी अटक केली आहे.


मृतक : दिपाली ज्ञानेश्वर मदने (वय २५) आठ महिन्यांची गर्भवती


आरोपी : ज्ञानेश्वर नंदू मदने (वय २८) पती

महिलेच्या भावाने दिलेल्या फिर्यादी नुसार, काल दुपारच्या दरम्यान ज्ञानेश्वर मदने यांनी फोन कॉलद्वारे माहिती देत सांगितले की, मृत दिपाली घरातील काम करत असताना पडल्यानं तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.ज्ञानेश्वर मदनेचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध असल्याचाही आरोप मृत महिला दिपालीचा भाऊ यांनी तक्रारीमध्ये केला आहे.या घटनेची माहिती मिळताच मध्यप्रदेशच्या बुऱ्हाणपूर येथून कारंजा इथं आले तेव्हा दिपाली त्यांना मृत अवस्थेत आढळून आली.महिलेचा भाऊ राहुल माने यानं आरोप करत सांगितले की, ज्ञानेश्वर मदने याचे दुसऱ्या महिलेशी अनैतिक संबंध होते, त्यामुळं तो दिपालीचा छळ करत होता. काही महिन्यांपूर्वी या प्रकरणी दोन्ही कुटुंबांमध्ये समझोता बैठक झाली होती. परस्पर सामंजस्यानं हे प्रकरण मिटवण्यात आलं होतं.मात्र अखेर दीपालीची हत्या करुन सासरी मंडळीने पिच्छा सोडला.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार मृत दिपालीच्या गळ्यावर असलेल्या खुणा बघून त्यांना संशय आल्यानं हत्याच केल्याचं कळते, त्या वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणी पुढील कारंजा शहर पोलीस करीत आहेत.

# आमदारांच्या शैक्षणिक संस्थेसमोरच कचऱ्याचा डेपो !

**केनवड येथील महाविद्यालयासमोरील प्रकार; मेहकर महामार्गालगत दुर्गंधीचा त्रास, विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात**

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

**विद्येचे मंदिर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाविद्यालयाच्या दारातच जर कचऱ्याचे ढीग साचत असतील, तर स्वच्छतेच्या कारभाराला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल आता केनवडवासीयांकडून उपस्थित केला जात आहे. रिसोड–मालेगाव मतदारसंघाचे विद्यमान आमदार अमित झनक यांची शैक्षणिक संस्था केनवड येथे असून, या संस्थेच्या महाविद्यालयासमोरच नागरिकांकडून कचरा टाकला जात असल्याने परिसरात कचऱ्याचा अक्षरशः डेपो तयार झाला आहे.**

मेहकर–मालेगाव राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे. महाविद्यालयात येणारे विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना या अस्वच्छतेचा त्रास सहन करावा लागत आहे.कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने दुर्गंधी वाढत असून, पावसाळ्यात कचरा ओला झाल्यानंतर परिस्थिती आणखी बिकट होण्याची शक्यता आहे. माशा-मच्छर, भटकी जनावरे आणि अस्वच्छतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.महामार्गालगतचा परिसर असल्याने या ठिकाणी स्वच्छता राखणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र शैक्षणिक संस्थेसमोरच कचऱ्याचा ढीग साचत असल्याने ग्रामपंचायत आणि संबंधित प्रशासनाच्या स्वच्छता व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.नागरिकांनीही सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता त्याची योग्य विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. त्याचबरोबर ग्रामपंचायत प्रशासनाने नियमित कचरा संकलनाची व्यवस्था करून कचरा टाकण्यास प्रतिबंध करावा, अशी मागणी होत आहे.आमदारांच्या शैक्षणिक संस्थेसमोरच कचऱ्याचा डेपो तयार झाला असेल, तर प्रशासनाला हा कचरा दिसत नाही का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात असून, तातडीने कचरा हटवून परिसराची स्वच्छता करण्याची मागणी होत आहे.केवळ कचरा उचलून प्रश्न सुटणार नसून, सार्वजनिक ठिकाणी वारंवार कचरा टाकणाऱ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणे गरजेचे आहे. महाविद्यालयासमोरील परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी कचरा संकलन, नियमित सफाई आणि कचरा टाकण्यास प्रतिबंध अशा तिन्ही पातळ्यांवर ठोस उपाययोजना करण्याची गरज आहे.






गुरूवार, दि.६ ऑगष्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

विद्येच्या मंदिरासमोर कचऱ्याचे साम्राज्य !

केनवडच्या शिवाजी विद्यालयासमोर कचऱ्याचे ढीग; विद्यार्थी- नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

एकीकडे स्वच्छतेबाबत जनजागृती केली जात असताना

असतील तर स्वच्छतेची जबाबदारी नेमकी कुणाची? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.गावातील सार्वजनिक तसेच

## अवघ्या ७ वर्षांच्या वायूने पायी सर केला हरिश्चंद्रगड; रिसोडच्या चिमुकल्याच्या साहसाचे सर्वत्र कौतुक

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

अहमदनगर जिल्ह्यातील सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेला, समुद्रसपाटीपासून तब्बल १,९७० मीटर उंचीवर असलेला आणि अत्यंत कठीण समजला जाणारा ऐतिहासिक हरिश्चंद्रगड अवघ्या सात वर्षांच्या चिमुकल्याने पायी सर करत विलक्षण धाडसाची ओळख करून दिली आहे. रिसोड येथील उद्योजक मयूर गंजे यांच्या सुपुत्राने केलेल्या या कामगिरीचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, लहान वयातही जिद्द आणि चिकाटीच्या बळावर मोठे यश मिळवता येते, हे त्याने सिद्ध करून दाखवले आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील सह्याद्रीच्या रांगांमध्ये वसलेला आणि अत्यंत दुर्गम समजला जाणारा ऐतिहासिक हरिश्चंद्रगड अवघ्या ७ वर्षांच्या वायू मयूर गंजे (समुद्र) या चिमुरड्याने पायी सर करून एक प्रेरणादायी विक्रम केला आहे. समुद्रसपाटीपासून सुमारे १,९७० मीटर उंचीवर असलेल्या या गडाची चढण अतिशय खडी, आव्हानात्मक आणि दमछाक करणारी मानली जाते. वायू मयूर गंजे हा रिसोड येथील प्रतिष्ठित उद्योजक मयूर गंजे (आप्पा) यांचा सुपुत्र असून, त्याने केलेली ही उल्लेखनीय कामगिरी रिसोड शहरासाठीही अभिमानाची बाब ठरली आहे.



हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्युज सुपरफास्ट कार्यालय नविन नगर परिषद कॉम्प्लेक्स, रविवार बाजार, वाशिम जि. वाशिम येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/26/A3072, RRC Helpline No. 8484842135